I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 374-376 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal Original Article
OPEN ACCESS
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# महिला सक्षमीकरणामध्ये राष्ट्रीय योजनेचे महत्व

डॉ. पिंकी गणवीर

*Corresponding Author: pinkiganvir.ganvir@gmail.com

Communicated :20.02.2022 Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 Published: 30.03.2022

**सारांश :**

१९९० च्या दशकापासून महिला समानता आणि सबलीकरण हे मुद्दे शासनाच्या कार्यात अग्रभागी राहिले आहेत. बेटी बचाव, बेटी पढाव या योजनेतून मुलींचे खरे महत्व समाजात पोहोचवले जात आहे. जर देशाला महिला सबल, कृतीशील असलेला समाज धारण करणारी संस्कृती तयार करायची असेल तर महिलांना पुरुषाइतकीच चांगली व समान संधी, हक्क, अधिकार व इतर सर्व सेवाही मिळाल्या पाहिजे. शाश्वत विकास साधणे आणि त्याचबरोबरीने शहरी आणि ग्रामीण महिलांना अनुभवावा लागणारा मागासपणा दारिद्र्य आणि सामाजिक बहिष्कार यांचे निर्मुलन करणे याबाबत शासन अग्रक्रमाने पुढाकार घेत आहे.

**बीजशब्द :** शासन आर्थिक परावलंबित्व स्त्रियांची मानसिकता स्त्री सक्षमीकरण

**प्रस्तावना :**

**''देशातील स्त्रियांच्या प्रगती शिवाय देशाची प्रगती शक्य नाही''**

महिला हि दैनंदिन जीवनामध्ये अनेक अशा भूमिका पार पाडत असते. कधी वात्सल्यपूर्ण माता, तर कधी प्रेमळ ताई, तर कधी कर्तव्यदक्ष मुलगी, तर कधी सक्षम सहचारिणी अशी विविध नाती ती निस्वार्थपणे निभावत असते. स्त्री ही घर आणि नोकरी अशी दोन्ही क्षेत्र अत्यंत कुशलतेने सांभाळत असते. असे असले तरी जगाच्या पाठीवर बऱ्याच ठिकाणी महिलेला समाजाकडून दुय्यम वागणूक मिळत असते. महिला मोठया प्रमाणात सामाजिक असमानता, अत्याचार, आर्थिक परावलंबित्व आणि अन्य सामाजिक अत्याचारांना बळी पडत असते. त्यांच्या वैयक्तीक आणि व्यावसायिक विकासामध्ये हा सर्वात मोठा अडसर ठरतो. महिलांनी फक्त 'चूल आणि मूल' याकडेच लक्ष दिले पाहिजे असे अनेक जणांना वाटते, पण आता महिलांनी चूल आणि मूलासोबतच 'देश आणि विदेश' याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. आजच्या स्त्रीने प्रत्येक क्षेत्रात उंच झेप घेतली आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये महिला या पुढे आहेत. त्यांनी उंच भरारी घेवून आपले कर्तुत्व जगभर पसरवले आहे. असे असले तरी अजुनही महिलांना पाहिजे तसा योग्य मान सन्मान आणि अधिकार मिळत नाही. त्यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करुन देणे गरजेचे आहे. घटनेने त्यांना अनेक अधिकार दिलेले आहेत. याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचली पाहिजे. स्त्री अजूनही १००ः सक्षम आहे हे आपण मान्य करु शकत नाही. स्त्रियांची मानसिकता बदलने हे अतिशय महत्वाचे आहे. ग्रामीण भागात स्त्रिया अजुनही स्वतः निर्णय घेऊ शकत नाहीत. त्या पुरुषांच्या निर्णयावर अवलंबून असतात. त्यांची निर्णय क्षमता वाढणे गरजेचे आहे.

**महिला सक्षमीकरण :—**

महिला हा समाजाचा कणा आहे. म्हणूनच त्यांचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. पंडित जवाहरलाल नेहरु यांनी म्हटले आहे की, ''लोकांना जागृत करण्यासाठी महिलांना जागरुक असणे आवश्यक आहे. जेव्हा एखादी स्त्री आपले पाउल पुढे टाकते तेव्हा तिचे कुटुंबही प्रगती करते, तिचे गावही पुढे येते आणि सर्वांचा विकास होतो'' महिलांचा सर्वांगीण विकासाकरीता गरज आहे ती महिला सक्षमीकरणाची.

**महिला सक्षमीकरणाचा अर्थ :—**

महिला सक्षमीकरणाचा खरा अर्थ असा आहे की, महिलांना त्यांच्या हक्कांची अधिकारांची जाणीव करुन देवून त्यांना त्यांचे सर्व निर्णय स्वतः घेण्यास सक्षमक करणे आवश्यक आहे.

एखाद्या व्यक्ती सक्षम असणे याचा अर्थ आहे, तो स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकतो आणि कोणाच्याही साहाय्याशिवाय जीवन जगू शकतो''

स्त्री सक्षमीकरण म्हणजे स्त्रीयांचा संपूर्ण विकास. प्रत्येक स्त्री हि सामाजिक, मानसिक आणि आर्थिकदृष्टया सुरक्षित आणि स्वतंत्र असली पाहिजे. महिला सक्षमीकरण आपल्या समाजासाठी खूप महत्वाचे आहे. त्यासाठी सर्वांनी पुढे आले पाहिजेच. पुरुषांनी स्त्रीला योग्य सुरक्षित वातावरण निर्माण करुन त्यांना त्यांचे कर्तुत्व सिध्द करण्यास प्रोत्साहित करुन त्यांना योग्य तो सन्मान, दर्जा आणि शक्ती प्राप्त करुन घेण्यास सहकार्य करावे. शारिरीक आणि लैंगिक दृष्टिकोनाने महिलेकडे बघण्याचा हेतू

बदलला पाहिजे. जेव्हा एखादी स्त्री स्वत:वर होणाऱ्या अन्यायाविरुध्द स्वत: आवाज करते व लढते. तेव्हा ती खऱ्या अर्थाने सक्षम झाली असेल. महिलांना सक्षम होण्याकरिता शिक्षण घेणे अत्यंत महत्वाचे आहे. शिक्षणामुळे त्यांची प्रगती साधली जावू शकते. शिक्षण हे प्रगतीचे अत्यंत प्रभावि माध्यम आहे. आजही ग्रामीण भागामध्ये मुलींना शिक्षित करण्याचे प्रमाण कमी आहे. स्त्री—पुरुष समानता काहीच प्रमाणात बघायला मिळते शहरी अथवा ग्रामीण भागामध्ये प्रगत कुटुंबामध्ये मुलीला बरोबरीचा दर्जा मिळतो. परंतु मागसलेल्या, भटक्या आणि दुय्यम दर्जा मिळालेल्या स्त्रीचा विकास पाहिजे तसा होतांना दिसत नाही. त्यांनाही प्रगतीच्या प्रवाहामध्ये आणणे अत्यंत गरजेचे आहे. महिला सक्षमीकरण यशस्वी करण्याकरिता सर्व स्तरातील, जातीतील, समाजातील स्त्रीचा महिला सक्षमीकरणामध्ये सहभाग असायला पाहिजे. सर्वच स्त्रियांना समान अधिकार देण्यात यावे. महिला सक्षमीकरण सर्वच महिलांकरीता उपयोगी ठरायला पाहिजे.

स्त्रियांच्या आत्मविश्वास वाढवून त्यांना प्रगतीच्या प्रवाहामध्ये आणून त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचे प्रयत्न सर्वच स्तरातुन व्हायला हवे. त्याकरिता शासनाबरोबरच सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे.

**महिला सक्षमीकरणाकरिता राष्ट्रीय योजना :—**

भारताला आणखी सक्षम आणि महासत्ता बनवण्याचा प्रयत्नाच्या दृष्टिने स्त्री सक्षमीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. स्त्री सक्षमीकरण म्हणजे स्त्रीयांचा संपूर्ण विकास. आज भारत शासनाद्वारे महिला सक्षमीकरणाकरिता अनेक योजना राबविल्या जात आहेत. महिलांना प्रगत आणि सर्वांगिण विकासाच्या दृष्टिने त्यांच्या करिता राष्ट्रीय पातळीवर मोठया प्रमाणात प्रयत्न सुरु आहेत. समाजातील विविध स्तरावरील महिलांना आत्म सन्मान, अंतर्गत मजबुती आणि रचनात्मक विकासास कारणीभूत होतील असे महिला सक्षमीकरण कार्यक्रम सुरु केले आहेत. भारत सरकारने २००१ हे ‘स्त्री सक्षमीकरण वर्ष’ म्हणून जाहीर केले. महिला स्वावलंबी व स्वयंपूर्ण व्हाव्यात, त्यांचा विकास व्हावा, त्या उत्साहाने विकासकामात सहभागी व्हाव्यात यासाठी शासन अनेक योजना राबवित आहे. महिला व बाल विकास कल्याण मंत्रालय भारत सरकारद्वारे महिला सक्षमीकरणाकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

- बेटी बचाव बेटी पढाव योजना
- महिला हेल्पलाईन योजना
- उज्ज्वल योजना
- वन स्टॉप सेन्टर स्कीम
- महिला शक्ती केंद्र
- स्वाधार योजना
- सपोर्ट टू ट्रेनिंग ॲण्ड एम्प्लॉयमेंट प्रोग्राम फॉर वुमन
- नारी शक्ती पुरस्कार
- महिला ई—हाट
- राष्ट्रीय महिलाकोष
- महिला व बालविकास ग्रामीण योजना
- सेन्ट्रल सोशल वेलफेअर बोर्ड
- राजीव गांधी राष्ट्रीय योजना
- कामगार महिलाकरिता वस्तीगृह योजना
- महिलाकरिता प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रम
- महिला बचत गट
- इंदिरा गांधी महिला संरक्षण योजना
- सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना
- बालिका समृध्दी योजना
- पंचायतराजमध्ये महिलांकरिता आरक्षण इत्यादी योजना भारत शासनाद्वारे महिला सक्षमीकरणाकरीता राबविण्यात येत आहे.

वरील सर्व योजना या प्रामुख्याने स्त्रीकरिता राबविण्यात येत आहेत. ज्याद्वारे महिला ही सक्षम होण्यास मदत होईल आणि त्यांचा आत्मविश्वास वाढेल. सर्वच स्तरातील महिलांकरिता या योजना फारच उपयोगी आणि प्रगती साधण्यास साहाय्य करणाऱ्या आहेत. समाजातील सर्वच महिलांनी या योजनाचा लाभ घेवून प्रत्येक कार्यक्रमामध्ये सहभागी होत स्वत:चा विकास साधायला हवा. आज महिलाकरिता शासनामार्फत त्यांच्या कल्याणाकरिता अनेक योजना सातत्यपूर्ण पध्दतीने राबविण्यात येत आहेत. महिलांची सुरक्षा आणि कल्याण यांची सर्वस्वी जबाबदारी शासनावर असते.

**समारोप :—**

स्त्रीला सक्षम करणे ही काळाजी गरज आहे. आपला भारत देश आज ज्या जलद गतीने आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रामध्ये प्रगती करत आहे. भारताचा मान मोठया प्रमाणात वाढलेला आहे. या सर्वांमध्ये स्त्रियांची भूमिका ही अत्यंत मोलाची आहे. आरोग्य, शिक्षण, संशोधन, तंत्रज्ञान या सर्व क्षेत्रात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने किंबहुना त्यांच्यापेक्षा जास्त सरसपणे काम करतांना दिसतात. इतके सगळे असुनही महिलांच्या सक्षमीकरणासाठी असून आपल्याला योग्य दिशेने पाऊल उचलणे गरजेचे आहे. शासनाने देशातील महिला सक्षमीकरणाची खोली समजुन घेऊन त्या प्रमाणात लोकांमध्ये जागृती निर्माण करायला हवी. पाठयपुस्तकांमधुन देखील महिलांच्या सक्षमीकरण यासंबंधी लहानपणापासुनच त्यांच्या मनावर बिंबवण्यासाठी अभ्यासक्रमात बदल केला पाहिजे. महिलांना त्यांच्या

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

हक्कांची, अधिकाराची जाणीव करुन दिली पाहिजे. त्यांना बरोबरीची वागणूक, सन्मान देवून त्यांच्या प्रगतीच्या वाटा खुल्या करुन दिल्या पाहिजे. स्त्री–पुरुष समानता हा विचार सर्वच स्तरात रुजविण्यास प्रयत्न करायला पाहिजे. स्त्री शिक्षणाचे महत्व सर्वांना पटवून देण्यास प्रबोधन करायला हवे. हे सगळे केलं तर भारताला संपूर्ण जगात महासत्ता बनण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही.

**संदर्भ :**

महिला सबलीकरण समस्या व उपाय : प्रा. डॉ. रेखा हिंगोले (माने), इशा प्रकाशन, शिवाजी चौक, लातूर, प्रथम आवृत्ती – २००६.

भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीचे बदलते आयाम – डॉ. छाया दातार, प्रकाशन – सुगावा, पुणे, प्रथम आवृत्ती – मे २००८.

भारतीय स्त्री संकल्पना आणि प्रतिमा : मीना केळकर, नितिन प्रकाशन पुणे, आवृत्ती १९९०.

महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा : मेधा नानिवडेकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती ९ जानेवारी २००६.

योजना विकास समर्पित मासिक : ऑक्टोंबर २०१८.

विकीपिडीया